वाचले :-

१.आदेश क्रमांक लेखा/कावि/४३८/२०१४ दि.९/०७/२०१४

२.आदेश क्रमांक प्रशा/१/कावि/२९०/२०१५ दि.२३/०३/२०१५

३.आपत्ती व्यवस्थापन विभागाकडील दि.२७/०८/२०१५ चे पत्र.

४.मा.आयुक्त यांचेकडील दिनांक १२/०९/२०१५ चा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.
क्रमांक-लेखा/१३अ/कावि/ ८८२/२०१५
दिनांक १४/०९/२०१५

**विषय** :- आहरण व वितरण अधिकारी घोषित करणेबाबत..

आदेश,

उपरोक्त क्रमांक १ चे आदेशान्वये महानगरपालिकेच्या विविध विभागासांठी आहरण व वितरण अधिकारी घोषित करण्यात आले आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विषयक कामकाज सुरळीत पार पडावे या करीता नव्याने आपत्ती व्यवस्थापन विभाग स्थापन करण्यात आला आहे.त्या विभागाचे विभाग प्रमुख म्हणून अतिरिक्त आयुक्त यांना घोषित करणेत आले आले.संदर्भिय २ चे आदेशान्वये आपत्ती व्यवस्थापनाचे कामकाज सहाय्यक आयुक्त यांचेकडे सोपविणेत आले आहे.

संदर्भिय क्रमांक ३ अन्वये सहाय्यक आयुक्त (आपत्ती व्यवस्थापन) यांनी आपत्ती व्यवस्थापन विभाग दि.१/०४/२०१५ पासुन स्वतंत्रपणे कार्यरत असलेने आपत्ती व्यवस्थापन विभागाकरीता आहरण व वितरण अधिकारी घोषित करणेबाबत विनंती केली आहे.

सबब,मी आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी १८ या आदेशान्वये आपत्ती व्यवस्थापन विभागासाठी 'सहाय्यक आयुक्त,आपत्ती व्यवस्थापन विभाग' यांना आहरण व वितरण अधिकारी घोषित करीत आहे.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत-

१.आपत्ती व्यवस्थापन विभाग.